॥ ज्योतिर्मय ॥
Online Journal of Literature....
साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ११४ वा ❑ शनिवार दि.१४ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

### नवीन नातेसंबंध जोडताना सावधगिरी हवी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

आजकाल वैवाहिक जीवनात खूप उतार चढाव बघायला मिळत आहे. स्वकेंद्रित व्यक्ती जीवन, अर्थार्जन, दोघात तिसऱ्याची एन्ट्री व सामाजिक माध्यमांमुळे वैवाहिक जीवनात वादळ निर्माण होत आहे.. या कारणांमुळे विशेषतः नवे वैवाहिक जीवनातील पती पत्नीमधील मतभेद विकोपाला जात असून मतभेदाचे रूपांतर विवाह विच्छेद,हत्या व आत्महत्येत होत आहे.मेघालय हनीमून हॉरर केस हे याचे उदाहरण आहे.नवीन वैवाहिक जीवनात एकदम वादळ निर्माण होऊन त्याची परिणिती राजाच्या हत्येत झाली. म्हणून नवीन नाते जोडताना सुरक्षितता राखणे आवश्यक आहे.

राजा आणि सोनमचे लग्न ११ मे रोजी झाले.

राजा रघुवंशी आणि सोनमचे लग्न ११ मे रोजी इंदूरमध्ये झाले. त्यानंतर दोघेही हनिमूनसाठी मेघालयला गेले. २३ मे रोजी ते नोंगरियाट गावातून बेपत्ता झाले. २ जून रोजी राजा यांचा मृतदेह जंगलात आढळला. पोस्टमॉर्टम रिपोर्टनुसार, त्यांच्या डोक्यावर दोन धारदार वारांचे निशाण होते – एक मागून आणि एक समोरून.

नवीन नात्यात सुरक्षितता राखण्यासाठी, संवाद, सीमा आणि एकमेकांबद्दल आदर हे महत्त्वाचे आहे. हे लक्षात घेतले पाहिजे की सुरक्षित वाटण्यासाठी, हे माहित असले पाहिजे की तुमच्या भावना ऐकल्या जातील, तुमच्यावर विश्वास ठेवला जाईल आणि तुमच्यावर हल्ला केला जाणार नाही. नवीन नात्यात सुरक्षितता राखण्यास मदत करणाऱ्या काही गोष्टी येथे आहेत:

खुले आणि प्रामाणिक संवाद: तुमच्या जोडीदाराशी बोलणे, तुमच्या भावना, गरजा आणि सीमांबद्दल मोकळेपणाने बोलणे आणि एकमेकांचे ऐकण्यासाठी वेळ काढणे महत्त्वाचे आहे.

**सीमा निश्चित करणे :**

कोणत्याही नात्यात, वैयक्तिक आणि भावनिक दोन्ही सीमा निश्चित करणे महत्त्वाचे आहे. यामुळे तुमच्या गरजा आणि इच्छांचा आदर केला जात आहे याची खात्री करण्यास मदत होते.

एकमेकांचा आदर: हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की आदर एकमेकांच्या गरजा आणि इच्छांचा आदर करण्यापलीकडे जातो. यात एकमेकांना सकारात्मकतेने पाहताना आणि त्यांच्या त्रुटी स्वीकारताना एकमेकांवर प्रेम करण्याची क्षमता समाविष्ट आहे.

**भावनिक सुरक्षितता :**

भावनिक सुरक्षितता म्हणजे तुम्हाला माहित आहे की तुमचा जोडीदार तुमची टीका करणार नाही, दोष देणार नाही, नाकारणार नाही, अमान्य करणार नाही किंवा काढून टाकणार नाही.

**सामायिक आवडी आणि क्रियाकलाप :**

सामायिक आवडी आणि क्रियाकलाप शोधल्याने तुम्हाला एकमेकांना चांगले जाणून घेण्यास आणि एकमेकांसोबत वेळ घालवण्यास मदत होऊ शकते. हे तुमचे नाते मजबूत करण्यास आणि तुम्हाला एकमेकांशी अधिक जोडलेले वाटण्यास मदत करू शकते.

**समस्या सोडवणे :**

कोणत्याही नात्यात मतभेद असतात, परंतु तुम्ही संवाद साधू शकता आणि वसमस्यांवर उपाय शोधू शकता हे महत्वाचे आहे.

**स्वतःची काळजी :**

तुम्ही स्वतःला वेळ द्या आणि तुमच्या गरजा पूर्ण करा याची खात्री करणे महत्वाचे आहे. हे तुम्हाला तुमच्या नात्यात अधिक आरामदायक आणि सुरक्षित वाटण्यास मदत करू शकते.

**सपोर्ट सिस्टम :**

तुमच्या मित्रांशी आणि कुटुंबाशी बोला आणि त्यांच्याकडून पाठिंबा मिळवा. ते तुम्हाला एकमेकांशी संवाद साधण्यास आणि तुमच्या सीमा निश्चित करण्यास मदत करू शकतात.

**सुरक्षित जोड :**

सुरक्षित जोड ही एक जोड शैली आहे जी नातेसंबंधांमध्ये विश्वास, सुरक्षा आणि स्वातंत्र्याला महत्त्व देते.

# ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळासाठी सातारा शहराची निवड

## सातारा जिल्ह्यात लेखक, कवी, रसिक, सामान्य माणूस यांच्यामध्ये आनंदाची लहर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**सातारा : ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या स्थळासाठी सातारा शहराची निवड झाली ही बातमी साताऱ्यात धडकली आणि सातारा जिल्ह्यात लेखक, कवी, रसिक, सामान्य माणूस यांच्यामध्ये आनंदाची लहर निर्माण झाली. सगळीकडे आनंदोत्सव साजरा करण्यात आला. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आणि मसाप–पुणे च्या शाहूपुरी – सातारा शाखेचे संस्थापक अध्यक्ष विनोद कुलकर्णी यांचे गेली १२ वर्षे साताऱ्याला अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा मान मिळावा यासाठी चाललेले प्रयत्न यशस्वी झाले. त्यांना खंबीर पाठींबा गेल्या १२ वर्षापासून दिला तो मा.ना. श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी.**






एखादी चांगली गोष्ट घडवून आणायची असेल तर त्यासाठी ध्यास घ्यावा लागतो. हा ध्यास विनोद कुलकर्णी आणि श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी एक तप घेतला हे स्पृहणीय. त्यासाठी गेली १२ वर्षे घेत असलेले श्रमही तितकेच मोलाचे.

यापूर्वी साताऱ्यात १९९३ मध्ये ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन झाले. कै. श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांचे नेतृत्वाखाली झालेल्या या संमेलनाने मराठी साहित्य संमेलनासाठी इतिहास घडविला. तीनही दिवस उस्फूर्त प्रतिसाद, महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या सर्व भागांतून आलेल्या प्रस्थापित आणि नवोदित दोन्ही साहित्यिकांची लक्षणीय उपस्थिती: भरगच्च आणि वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांची रेलचेल, मनोरंजनाचे अभिरूची संपन्न कार्यक्रम, परिसराची डामडौल नसलेली परंतु कलात्मक सजावट, अंगावर न येणारी परंतु रूचकर साधी जेवणं, रूसव्याफुगव्यांना मिळालेली संपूर्ण सोडचिठ्ठी, संमेलनाचे आयोजक स्वागताध्यक्ष श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांचे संयमित खानदानी व्यक्तिमत्व आणि त्यांना मिळालेली सर्व स्तरातील कार्यकर्त्यांची, साहित्यिकांची साथ अशा अनेक कारणांमुळे सातारचे ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यशस्वी झाले. त्यावेळी कार्याध्यक्ष असलेले कै. शंकर सारडा यांनी कार्यक्रम आखताना दाखवलेली कल्पकता पण तितकीच महत्वाची ठरली.

सातारा येथील संमेलन होण्यापूर्वी साहित्य संमेलनांना चांगले वळण मिळणार की नाही अशी चिंता अनेकांना वाटत होती. व्यक्तिस्तोम, पैशाची वारेमाप उधळपट्टी, संयोजकातील मानापमान या गोष्टीमुळे ती भीती निराधार नव्हती. ६५ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कोल्हापूर येथे १९९२ मध्ये झाल्यानंतर पुढील संमेलन पुढील वर्षी गोवा येथे होणार होते. पण गोवा येथील आयोजकांनी कोल्हापूरच्या झालेल्या संमेलनाचा अवाढव्य खर्च बघता संमेलन आयोजन करण्यास असमर्थता दर्शविली. त्याचप्रमाणे कोल्हापूरच्या संमेलनाचा अनुभव बघता, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाकडे साहित्य संमेलन आयोजन करण्यासाठी कोणाचीच मागणी नव्हती. सातारकरांना पुढील काळात, काही वर्षात मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी संधी मिळेल या अपेक्षेने त्यावेळचे आमदार अभयसिंहराजे भोसले यांनी केलेली मागणीचे एकमेव पत्र महामंडळाकडे होते. माधव गडकरी त्या काळात महामंडळाचे प्रमुख मार्गदर्शक होते. तर सुरेश व्दादशीवर महामंडळाचे अध्यक्ष होते. माधव गडकरी सर्वांना असे म्हणाले... अभयसिंहराजे भोसले हे सुसंस्कृत नेतृत्व असून आपण ६६ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन साताऱ्याला देऊया. आणि अचानकपणे तसा विचार केला तर, कोणतीही तयार नसताना ६६ व्या मराठी साहित्य संमेलनाची जबाबदारी श्री. छ. अभयसिंहराजे भोसले यांच्याकडे आली. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली ६६ वे साहित्य संमेलन न भूतो... न भविष्यती असे यशस्वी झाले. सातारकरांनी साहित्य संमेलनाचा घसरलेला गाडा पुन्हा राजमार्गावर आणला.

सातारच्या साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे ते एककेंद्रानुवर्ती झाले नाही. संमेलनाची केंद्रे अनेक होती. आयोजक व स्वागताध्यक्ष अभयसिंहराजे भोसले यांनी सातत्याने प्रकाशझोतात राहायचं जाणीवपूर्वक टाळलं. तो त्यांचा स्वभावही नव्हता. अनेकदा ते एकटे, सुटे संमेलनात वावरत. गोतावळा बाजूला ठेवीत. संमेलनाध्यक्ष विद्याधर गोखले यांच उद्घाटनाचं भाषण फार लांबल तरी उत्तम झाल. मैफल जमविण्यात तर त्यांचा हातखंडा होता. त्यांचे चाहते त्यांच्याभोवती असतच; परंतु अध्यक्ष असूनही संमेलनाचे ते एकमेव केंद्र नव्हते. याचं कारण म्हणजे संमेलनाला नामवंत, प्रस्थापित लोकप्रिय आणि तरुण अशा सर्वांची असलेली भरघोस उपस्थिती. ज्ञानपीठ विजेते सुभाष मुखोपाध्याय, विंदा करंदीकर, गंगाधर गाडगीळ, वसंत कानेटकर, माधव गडकरी, नारायण सुर्वे, शंकर वैद्य, शांता शेळके, द.मा. मिरासदार, आनंद यादव, व.पु. काळे, शिवाजी सावंत याच्यापासून ते बाबा महाराज सातारकर आणि शिवाजीराव भोसले यांच्यापर्यंत सर्व जणांनी लोकांना विविध वेळी ओढ होती. आपुलकी होती ती दिसत होती. संमेलनाध्यक्ष, त्यांची निवडणूक आणि निवडणूक पद्धत महत्वाची असली तरी अध्यक्ष हे एकमेव केंद्र राहणार नाही, असं संमेलनाच आयोजन केलं तर निवडणुकीला आणि त्यामुळे होणाऱ्या वादांना महत्व येणार नाही, हे सातारच्या संमेलनाने स्पष्ट केले. अध्यक्षपदाचे पराभूत उमेदवार यदुनाथजी थत्ते यांना बालवाचक मेळाव्याचं अध्यक्षस्थान देण्यात आलं, आणि त्यांनीही ते मोकळ्या मनाने स्वीकारल ही आवर्जून दखल घ्यावी अशी गोष्ट या संमेलनात ठरली. अध्यक्षपदाची माळ गळ्यात पडली नाही, तरी संमेलनाला आवर्जून उपस्थित असल्याचा गेल्या कित्येक वर्षातील अपवादात्मक प्रसंग या संमेलनात घडला. साताऱ्याच्या साहित्य संमेलनाचे संयोजन हा खरोखरीच मनाला समाधान देणारा भाग होता. पैशाचा भपका येथे नव्हता. इतर काही संमेलनात यापूर्वी जाणवलेला काहीसा तुसडेपणा येथे दिसला नाही. अव्यवस्थाहि नव्हती. संयोजकांनी अतिशय आपुलकीने आणि आस्थेने या संमेलनाचे संयोजन केले आहे हे पदोपदी जाणवत होते. अभयसिंहराजे भोसले यांचा लोकसंग्रह, सर्वांशी मिळूनमिसळून वागण्याचा त्यांचा स्वभाव, सर्वांच्या अडीअडचणी स्वतः समजून घेऊन त्या लगेच सोडविण्याचा त्यांचा प्रयत्न यामुळे हे संमेलन चांगल्या प्रकारे पार पडण्यास फार मोठा हातभार लागला. राजघराण्यातील हा माणूस साहित्य संमेलनात सगळीकडे सर्वसामान्य माणसाप्रमाणे वावरत होता आणि संमेलनाची व्यवस्था पाहात होता. अभयसिंहराजे भोसले हे राजकारणी आहेत आणि राजघराण्यातील आहेत असे साहित्य संमेलनात कुठेहि जाणवले नाही. समारोपाच्या समारंभात श्री. छ. अभयसिंहराजे भोसले यांच्याच भाषणाने बाजी मारली. ते त्यावेळी म्हणाले.... ‘‘आपण जे काम स्वीकारतो ते उत्तम रीतीनेच करतो.‘‘ ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन कै. श्रीमंत छत्रपती अभयसिंहराजे भोसले यांचा वारसा सजगतेने जपणारे श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले होणारे मराठी साहित्य संमेलन यशस्वी रित्या साहित्य संमेलनातील नवीन पायंडा निर्माण करतील याची मराठी माणसाला खात्री आहे. विनोद कुलकर्णी यांची भक्कम साथ त्यांना लाभली आहे.

# ज्येष्ठांच्या विरंगुळा केंद्र उभारण्यासाठी सदैव प्रयत्नशील – शत्रूघ्न काटे

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**चिंचवड –** ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तसेच त्यांच्या विरंगुळा केंद्राच्या उभारणीसाठी आपण कटीबद्ध असल्याचे प्रतिपादन पिंपरी चिंचवड भाजपाचे जिल्हाध्यक्ष शत्रृघ्न काटे यांनी केले. पिंपरी चिंचवड येथील ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

शुक्रवार दि. १३ रोजी रामकृष्ण मोरे सभागृहात झालेल्या या समारंभास खा. श्रीरंग बारणे, आ. उषाताई खापरे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद पवार , दिनकर गावडे, आदी प्रमुख




पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचा प्रारंभ भारतमातेचे पूजन आणि दिपप्रज्वलनाने करण्यात आला. यावेळी खा. श्रीरंग बारणे, आ. ऊषाताई खापरे, वरीष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद पवार यांनी ज्येष्ठांनी संवाद साधला. खा. बारणे यांनी ज्येष्ठ नागरिक महासंघ भवनाच्या पुर्ततेसाठी प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला. महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ, कार्याध्यक्ष बाबुराव फ ुले आदिंनी महासंघाच्या वाटचालीसंदर्भात मनोगत व्यक्त केले. ईश्वरलाल चौधरी यांनी अहवाल वाचन केले. आर्थिक लेखा जोखा हेमचंद्र जावळे यांनी मांडला. अतिशय उत्साहात पार पडलेल्या या वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष संगीत मैफलीत सुप्रसिद्ध कलावंत वैशाली घोडेकर आणि लहू पांचाळ यांनी ‘‘ स्वररंग संगीत ‘‘ हा सदाबहार मराठी – हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करुन उपस्थित ज्येष्ठांची मने जिंकली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय शिनकर यांनी केले. सुत्रसंचलन सुभाष कुलकर्णी यांनी केले तर शांताराम सातव यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महासंघाच्या अध्यक्षा वृषालीताई मरळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास पिंपरी चिंचवड मधील दिडशेच्यावर ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

***






# जात्यावरच्या ओव्या......

सरल दळण
माझ्या पिठावर कणी
देव भगवंत
माझ्या बरकतीचे धनी ||१२१||

माझ्या अंगणात
सडा गाईच्या शेणाचा
दारावरून गेला
रथ सूर्यनारायणाचा ||१२२||


संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# लाईफ इज ब्युटीफुल (माझ्या कवडसे सोनेरी.. अंतरीचे या पुस्तकातील लेख )




ज्योतिर्मय साहित्य


मध्यंतरी एका इटालियन चित्रपटाची कथा माझ्या वाचनात आली. त्या कथेने मला आकृष्ठ करून घेतले. नंतर मी इंटरनेटवर या चित्रपटाचे संदर्भ शोधले. आणि हा चित्रपट जरी मी अजून पाहिला नसला तरी त्याच्या कथेने मला भारावून टाकले. त्या चित्रपटाचे नाव आहे ' लाईफ इज ब्युटीफुल '. या चित्रपटाने अभिनयाचे ऑस्कर सहित अनेक पुरस्कार मिळवले. या चित्रपटावर काहींनी टीका केली असली तरी जगातील सुंदर चित्रपटांपैकी तो एक आहे हे निश्चित.




काही माणसांकडे विलक्षण सकारात्मक उर्जा असते. जीवनात कितीही कसोटीचे प्रसंग आले तरी अशी माणसे विचलित न होता त्यातून काही तरी चांगले करण्याची क्षमता ठेवतात. अगदी मृत्यू समोर असला तरी ते त्याही प्रसंगाला अशा पद्धतीने सामोरे जातात की मृत्यूला देखील त्यांना सलाम करावासा वाटेल. रोबर्टो बेनिग्नी या दिग्दर्शकाचा हा चित्रपट. यातील नायकाची भूमिका त्यानेच केली आहे. दुसऱ्या महायुद्धाची पार्श्वभूमी लाभलेल्या या चित्रपटाची थोडक्यात कथा अशी.

साधारणपणे या चित्रपटाच्या कथेचे दोन भाग करता येतील. पहिला भाग निखळ विनोदी आणि प्रेम प्रसंगांनी भरलेला आहे. याची सुरुवात होते खेडेगावातून गुडो नावाचा तरुण आपल्या काकाच्या हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करण्यासाठी येतो या प्रसंगाने. या ठिकाणी त्याची डोरा नामक सुंदर युवतीशी गाठ पडते आणि तो अक्षरशः तिच्या प्रेमात वेडा होतो. डोरा एका श्रीमंत अधिकाऱ्याशी लग्न करणार असते. गुडो हा ज्यू तर डोरा ही इटालियन. गुडो हा अत्यंत गरीब तर डोरा ही धनाढ्य कुटुंबातील. पण काहीही असले तरी आपण डोराशीच लग्न करायचे असा निश्चय गुडो करतो. आणि शेवटी अथक प्रयत्नातून तिचे मन जिंकण्यात यशस्वी होतो. त्यांचे लवकरच शुभमंगल होते. साधारण पाच वर्षानंतर या दोघांच्या संसारवेलीवर जोशुआ नामक एक फुल फुलते. गुडो आता शहरात पुस्तकांचे दुकान चालवतो तर डोरा शिक्षिकेचे काम करते. जोशुओच्या बाललीला त्यांना मोहवून टाकत असतात.

एका बाजूला त्यांचा हा संसार फुलत असताना दुसरीकडे १९४५ चे महायुद्ध अंतिम टप्प्यात आलेले असते. जर्मनी प्रमाणेच इटलीतील ज्यू लोकांचे शिरकाण करण्यासाठी इटलीतील फॅसिस्ट सरकारने छळछावण्या उभारलेल्या असतात. दररोज शेकडो ज्यू स्त्रीपुरुष या कॅम्पमध्ये बळी देण्यासाठी नेले जात असतात. यामध्ये आपल्या चित्रपटाचा नायक गुडो, त्याचे काका आणि निरागस जोशुआ यांचाही नंबर लागतो. साक्षात मृत्यूची छाया समोर असते. या वेळी डोराला इटालियन म्हणून सुटकेची संधी असते. पण आपल्या पती आणि मुलासाठी ती स्वतःहून त्यांच्यासोबत गाडीमध्ये जाते. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# पादसेवन भक्ति

ज्योतिर्मय साहित्य

२) निवेदन-माणसाचा अहंकार रूपी मी बुद्धी मन व इंद्रिये या सर्वात मी पणा काठोकाठ भरलेला असतो. तो मी पणा नाहींसा केला की द्रुश्याचा शेवट झाला. त्या मी ला भगवंताच्या चरणीं अर्पण करणे हाच आत्मसाक्षात्कारचा राजमार्ग आहे म्हणून संगत्याग व निवेदन एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.


३) विदेहस्थिति - सामान्य माणसाची सदेहस्थिति असते. हा माझा देह आहे. या अहंकाराने तो वागत असतो. देहाला तो चिकटलेला असतो. देहाला बांधलेला असतो. हा देहाचा विसर पडून भगवंत चरणीं एकरूप होणे म्हणजेच विदेहस्थिति होय.

४) अलिप्तपणा - लिप् म्हणजे लिंपणे. लेप करणे. माखणे, दुषित करणे, व्यापणे लिप्त म्हणजे माखलेला लेप लागलेला. अलिप्त म्हणजे न माखलेला. दुषित न झालेला. शुध्द सात्विक. लहान बालकाच्या जवळ जसे अत्यंत पवित्र मन असते सगळं जग त्याला आपलं वाटतं आईच्या कडेवर बसूनही तो आजूबाजूच्या लोकांकडे बघून हसतो. त्याचं निरागस हास्य म्हणजे पूर्णावस्था होय.

लोभस, शांत परणपवित्र. तो मोठा होतो . अविद्येच्या अभावामुळे आपली मुळ अवस्था विसरतो या द्रुष्य अशाश्वत जगात गुरफटून जातो आणि दुषीत होतो. ही जग रहाटी आहे .

भगवंत भक्त मंडळी. सहजस्थिति

सह जन्मना एव ऊत्पन्नम् लहान बालक अर्भक जसे आईच्या ऊदरात असते तेव्हा त्याचा बाहय जगाशी संबंध नसतो. पण जन्माला आलेल्या बालकाला बाह्य जगाशी जुळवून घ्यावेच लागते. तरच तो या भौतिक जगात वावरेल. सुख व दुःख या दोन्ही गोष्टीला तयार असणे म्हणजेच सहजस्थिति होय. म्हणजेचमानवी मनाची जडणघडणही बाल्यावस्थेत होते. चंचल मन स्थिर होते. बाह्यजगातील भलेबुरे स्विकारून आपली प्रगती करणे, आपल्या कुटूंबाल आनंद देणे, समाजाला आनंद देणे व घेणे यालाण सहजस्थिति होय. संगत्याग साधला की त्याचेच परंतु आता सहजावस्थेत होते. **(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# सगुणभक्ति

ज्योतिर्मय साहित्य

सर्वांभूती भगवंत आहे याची खात्री पटायच्या आधी, तो माझ्यात आहे हे पटले पाहिजे. सोन्याचा दागिना ' मला सोने भेटवा ' असे म्हणत नाही; त्याचप्रमाणे, मला भगवंत बाहेरून कुठून भेटायचा आहे असे नाही समजू. तो आपल्याजवळच आहे. मनुष्य बोलतो तसा जर वागला तर त्याला त्याची प्रचीती आल्याशिवाय राहणार नाही. मी 'कुणाचा' आहे हे जर जाणले तर मी ' कोण ' हे कळायला वेळ लागायला नको. सत्समागम केला म्हणजे मी कोण आहे हे कळते. साक्षीरूपाने नटलेला जो ' मी ', त्याला पाहायला जंगलात जायला नको. ' माझेपण ' सोडावे म्हणजे ' मी ' चा बोध होतो. भगवंत चोहोकडे भरलेला आहे असे आपण नुसते तोंडाने म्हणतो, पण त्याप्रमाणे वागत नाही हे आपले मूळ चुकते. भगवंत माझ्यात आहे तसाच तो दुसऱ्यातही आहे, हे आपण सोयिस्करपणे विसरून जातो. जसा खोलीतला दिवा प्रकाशाने सर्व खोली व्यापून टाकतो, तसे हे सर्व जग भगवंताने व्यापून टाकले आहे. मी कर्ता नसून राम कर्ता आहे हे म्हटले म्हणजे त्यात सर्व आले. पोशाख निरनिराळे केले तरी मनुष्य हा एकच असतो. संन्यास हा मनाचा असतो, पोशाखाचा नसतो. मनावर कशाचाच परिणाम होऊ न देणे हाच संन्यास.

सगुणभक्ती करावी, भक्तीने नाम घ्यावे, नामात भगवंत आहे असे जाणावे, आणि भगवंताचे होऊन राहावे, हाच परमार्थाचा सुलभ मार्ग आहे. साधुसंतांनी अतिशय परिश्रम घेऊन आणि स्वत: अनुभव घेऊन हा मार्ग आपल्याला दाखवून दिला आहे. आपले ज्याच्याशी साम्य आहे त्याच्याशी आपली मैत्री जमते. आपण देही असल्यामुळे आज आपला देवही आपल्यासारखाच, पण त्याच्याही पलीकडे असणारा असा पाहिजे. अशा प्रकारचा देव म्हणजे सगुण मूर्ती होय. लहान मुलगा एखाद्या वस्तूसाठी हट्ट करू लागला की, आपण त्याच्यापुढे त्या वस्तूसारख्या इतर, पण बाधक नसणाऱ्या वस्तू टाकतो. त्याचप्रमाणे, सगुणोपासनेचा परिणाम होतो. दृश्य वस्तूंवर आपले प्रेम आहे; जे दिसते तेच सुखाचे आहे असे आपल्याला आज वाटते; म्हणून आपणच आपल्या कल्पनेने भगवंताला सगुण बनविला आणि त्याची उपासना केली. आपली बुद्धी निश्चयात्मक होण्यात या उपासनेचा शेवट होईल. आग्रह आणि प्रेम फक्त एका भगवंताच्या ध्येयाबद्दल असावे. इतर ध्येये असावीत, पण त्यांचा आग्रह नसावा. प्रपंचामध्ये व्यवहार होत असताना भगवंतापासून जेव्हा वृत्ती हलत नाही, तेव्हा तिला ' सहजसमाधी ' असे म्हणतात. सहजपणाने जगणे, म्हणजे सहजपणातून वेगळे न राहणे, हीच सहजसमाधी होय. ' राम सर्व करतो ' आणि ' राम माझा दाता आहे ' ही भावना ज्याची स्थिर झाली, त्याच्यावर भगवंताची कृपा झाली असे समजावे. त्याच्या जन्माचे सार्थक झाले हे सांगणे नकोच.

नाम घेताना स्वतःचा विसर पडणे ही सर्वोत्कृष्ट समाधी होय. नामात स्वतःला विसरण्यास शिकावे.

## || संत महात्म्य ||

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

# महात्म्यांचा अविर्भाव

ज्योतिर्मय साहित्य

या लेख मालेच्या प्रारंभापासून आपण भगवंता सोबत अवतीर्ण झाले त्यांचे सोबत जे महात्मे प्रभूचे नातेवाईक म्हणून, जे महात्मे श्री राधा राणीच्या सख्या म्हणून तर जे महात्मे प्रभूचे सखा, सवंगडी म्हणूनच अवतरले त्यांचा कथा आपण पहात आहोत.

चरित्र ते उच्चारावे देवें केले गोकुळी. असे म्हणतात. भगवंताच्या, संतांच्या चरित्राचे गायन श्रवण करणे हा भक्ती मार्गाचा उत्तम उपाय सांगितला आहे.

भगवंताचे ८ सवंगडी भगवंता सोबत अवतारात आले त्यांची नावे आपण मागील भागात पाहिली. हेच ८ सखा कलियुगात ही अवतरित झाले. इसवीसनाच्या १५ व्या शतकात धर्म ग्लानी आलेल्या समाजाला. यांनी नवं संजीवनी दिली.

भगवंतावर प्रेम म्हणजे त्याने निर्मित सर्व भूत्मात्रावर प्रेम. या जगताच्या कणा कणात आनंद हुडकायचा, सर्व जीव जंतुला प्रभू समजून प्रेम करायचे हे या महात्म्यांनी या अवतारात शिकविले.

मागील भागात आपण संत श्रेष्ठ श्री सूरदास यांचे अल्प चरित्र पाहिले. आता द्वापार युगात भगवंता सोबत अवतरीत झालेले अन्य सवंगडी ज्यांचा कलियुगात, अलीकडेच, अवतार झाला त्यांचे चरित्र पाहू.

२) परमानंद :- श्री परमानंद या श्रेष्ठ कृष्णभक्त कवीचे पूर्वाश्रमीचे नाव अनिरुद्ध कुमार पांडे असे होते. त्यांचा जन्म संवत १५५०, उत्तर प्रदेश मधील कन्नौज येथे झाला. आणि त्यांचा मृत्यू ज्येष्ठ शुद्ध द्वादशी संवत १५७७ मध्ये झाला. हे ९१ वर्ष जगले.

हे पूर्व जन्मी श्रीकृष्णाचा टोक नावाचा सखा होते. आणि चंद्रभागा नावाची जी राधेची सखी होती त्यांचाच हा अवतार मानला जातो.

त्यांच्या आईचे नाव रमादेवी आणि वडील शंभू पांडे असे होते.

यांच्या एकूण ८३५ रचना उपलब्ध आहेत. त्यांची एक रचना अतिशय गोड आहे

आज दधि मिठो मदनगोपाल /
भावो मोही तुम्हारो झुटो /
सुंदर नयन विशाल //
बहुत दिवस हम रहे कुमुद वन/
कृष्ण तिहारे साथ //
ऐसे स्वाद हम कबहून देखो
सुनो गोपाल के नाल....

३) गोविंद दास स्वामी :

पुष्टी संप्रदायाचे संस्थापक श्री वल्लभाचार्य यांनी त्यांचे चार शिष्य आणि वल्लभाचार्यांचे पुत्र आणि शिष्य श्री विठ्ठल दास यांचे चार शिष्य असे एकत्रित आठ शिष्यांत समूह तयार केला होता. यांनाच अष्ट छाप कवी असे म्हणतात. त्यातील गोविंददास स्वामी हे श्री विठ्ठलदास यांचे शिष्य होते. यांचा जीवन काल इसवी सन १५०५ ते १५८६ असा झाला. यांची तपोभूमी गोवर्धन पर्वतावर आणि ऐरावत कुंडा जवळ जातिपुरा जवळ हे स्थान आहे येथे होती.

हे रोज गोड आवाजात भगवंताला विविध पदे ऐकवीत. हे श्री दामा यांच्या अवतार आहेत. भगवत भक्तीत ते इतके लीन होते की, सतत भगवंत आपल्या सोबत आहेत, त्यांची आपण सेवा करतो आहोत या दृढ भावाने त्यांनी भक्ती केली. गोवर्धन पर्वतावर ते जिथे रहात तिथे त्यांनी भगवंतासाठी एक झोका बांधला होता. प्रभू या झोक्यावर बसून, त्यांना आपण झोका देत आहोत, या निर्मळ भावाने, ते सदैव प्रभूची सेवा करीत.

या श्रेष्ठ संतांच्या विमल चरणावर नतमस्तक होऊ यात. प्रगाढ भक्तीची परिसीमा गाठणाऱ्या या संतश्रेष्ठ भक्तांना विनम्र अभिवादन करुयात.

हरी बोल हरी बोल हरी हरी बोल मुकुंद माधव हरी हरी बोल!

**(क्रमशः)**

## || निरूपण ||



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं प्रभातसमये नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यमपराह्णे नमो नमः।। २४ ।।**

जगदंबिके, तुला प्रभात समयी नमस्कार असो. जगदंबिके, तुलादुपारचे समयी नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं सन्ध्यायां ते नमो नमः।**
**निशायां च नमो मातः नमस्तेऽस्तु सदा सदा।। २५।।**

जगदंबिके, तुला संध्याकाळी त्रिवार नमस्कार असो. रात्रीचे समयी नमस्कार असो. तुला सदा सदा नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं वरप्रदे धनप्रदे।**
**धान्यप्रदे नमस्तुभ्यं स्वास्थ्यप्रदे नमो नमः।। २६ ।।**

हे वरदायिनी, धनदायिनी, जगदंबिके, तुला नमस्कार असो. धान्यदायिनी, स्वास्थ्यदायिनी, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं दयावति कृपावति।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं सद्वंशवृद्धिहेतवे।। २७ ।।**

दयावती, कृपावती, जगदंबिके, तुला नमस्कार असो. सद्वंशवृद्धीसाठीजगदंबिके, तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यमनुकम्पास्वरूपिणि।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं चन्द्रकलासुशोभिते।। २८ ।।**

हे अनुकंपास्वरूपिणी, जगदंबिके, तुला नमस्कार असो. भाळी चंद्रकोर शोभणारे,जगदंबिके, तुला नमस्कार असो.



## आरोग्य संजीवनी

# उपाशी पोटी काळे मनुके खा, ह्रदय विकार टाळा

ज्योतिर्मय साहित्य

२) रक्तदाब नियंत्रित ठेवते

काळ्या मनुकात पोटॅशियम आणि चे प्रमाण जास्त असते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते. दररोज काळ्या मनुका खाण्यामुळे रक्तदाब नियंत्रित होण्यास मदत होते. हाय ब्लडप्रेशरमुळे हार्ट अटॅक, स्ट्रोक (पक्षाघात) आणि किडन्या निकामी होण्याचा धोका वाढतो. त्यामुळे ब्लडप्रेशर कंट्रोलमध्ये ठेवणे आवश्यक असते.

३) हिमोग्लोबिन व रक्त वाढवते

काळ्या मनुक्यात लोह व इतर जीवनसत्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे रक्तातील हिमोग्लोबिन वाढण्यास मदत होते. यासाठी १० ते १२ काळ्या मनुका वाटीभर पाण्यात भिजत घालून त्यात थोडासा लिंबूरस घालावा. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजलेले मनुके चावून खावेत. यामुळे रक्तारील हिमोग्लोबिन वाढते त्याचबरोबर रक्त शुद्ध होते आणि रक्ताचे प्रमाणही वाढते.

४) डोळ्यांचे आरोग्य सुधारते

काळ्या मनुकामध्ये डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त असणारे आणि हे घटक असतात. त्यामुळे डोळ्यांची दृष्टी निरोगी राहण्यास मदत होते. याशिवाय यामुळे रेटिनामध्ये ऑक्सिडेटिव्ह डॅमेज होत नाही त्यामुळे अकाली अंधत्व येण्यापासून बचाव होतो.

५) डायबेटीससाठी उत्तम

काळ्या मनुकातील हा घटक डायबेटीसमध्ये उपयुक्त ठरतो. यामुळे रक्तातील साखर आटोक्यात राहण्यास मदत होते. शिवाय काळ्या मनुकांचा ७० पेक्षाही कमी असल्यामुळे ते मधुमेही रुग्णांसाठी योग्य ठरतात.

६) अशक्तपणा दूर होतो

दररोज सकाळी भिजलेले काळे मनुका खाल्ल्यामुळे अशक्तपणा दूर होण्यास मदत होते. यामध्ये व्हिटॅमिन-, व्हिटॅमिन-, व्हिटॅमिन-, विविध मिनरल्स यासारखे अनेक पोषकघटक असल्याने रोग प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.

७) पोट साफ होते

काळ्या मनुका सारक गुणांच्या असतात. त्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते. यासाठी १० ते १२ मनुका पाण्यात भिजवून रात्री खाल्यास सकाळी पोट साफ होऊन बद्धकोष्ठता दूर होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

८) पित्त कमी करते

काळ्या मनुका ह्या पित्तशामक गुणांच्या असतात. त्यामुळे पित्त कमी होण्यास मदत होते. ऍसिडिटी किंवा आम्लपित्ताचा त्रास असल्यास दररोज सकाळी भिजलेले काळे मनुका खाणे उपयुक्त ठरते.

९) मेंदूसाठी उपयुक्त

काळे मनुका खाण्यामुळे मेंदू तल्लख होऊन स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढण्यास मदत होते. मानसिक तणाव, नैराश्य दूर करण्यासही काळ्या मनुका उपयुक्त ठरतात.

१०) वंध्यत्व समस्येवर उपयुक्त

काळ्या मनुका वृष्य गुणांच्या असल्यामुळे पुरुषांमध्ये शुक्रधातुचे प्रमाण वाढवतात तर स्त्रियांमध्ये गर्भाशयाच्या विकारात उपयुक्त ठरतात. काळ्या मनुका नियमित खाण्यामुळे मासिक पाळीच्या तक्रारी दूर होतात. पाळीच्या वेळी रक्त जास्त जाणे, अशक्तपणा येणे, स्त्रियांमध्ये हिमोग्लोबिन कमी होणे यासारख्या समस्या दूर होतात.

काळे मनुके कसे खावे..?

सुक्या मेव्यातील काळ्या मनुका तशाही खाऊ शकतो किंवा १० ते १२ काळ्या मनुका रात्री वाटीभर पाण्यात भिजत घालून दुसऱ्या दिवशी सकाळी भिजलेले मनुका उपाशीपोटी खाणे जास्त लाभदायी ठरते.

***

## ||श्री राम कथा||





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

यज्ञ रक्षण हे क्षत्रियांचे कर्तव्य आहे.म्हणुन रामचंद्र प्रभु कडून यज्ञ रक्षण करविले. यज्ञ अनेक प्रकाराचे असतात.पाऊस पडला पीक आले हा ही यज्ञ आहे,पती पत्नीच्या संयोगातून मूल जन्मते.विर्य हे हवीर् द्रव्य आहे व ते स्त्री रूप कुंडात त्यांचे हवन केले जाते म्हणून तोही यज्ञ आहे. यज्ञ म्हणजे ज्याचा जो हक्क तो त्यास देणे.यामुळे प्रत्येक घटकास सहाय्य होते. त्यांना त्यांना त्याचा भाग देणे याला यज्ञ म्हणतात.हे जग चालण्या करता, जग सुघटीत होण्या साठी ज्याचा भाग त्याला मिळायला हवा. निसर्गाच्या प्रत्येक घटकाने आपापले योगदान द्यायला हवे. पसायदान मध्येही यज्ञाची ही कल्पना अनुस्यूत आहे. उत्तम समाजा धारणेसाठी समाजाच्या प्रत्येक घटकाने आपले योगदान द्यावे. दुष्टानी आपला दुष्टपणा सोडावा. सज्जनांनी इतरास सहाय्य करावे. संतांनी लोककल्याण करावे. अशी सर्व स्तरावरील घटकांना माऊली आज्ञा देतात. संतांचा मांदियाळी भेटो तया भूता. सिद्ध लोकांनी गिरी कंदारात, एकांतात साधना करीत राहण्या ऐवजी जनकल्याण करण्यासाठी लोकांत यावे. हा पसायदान मध्ये माऊलींचा विचार आहे. विश्वामित्र रामास प्रशिक्षण देत होते.छोटे मोठे राक्षस मारत मारत त्यांना ,रामास रावणा पर्यंत न्यायचे आहे. रावणास हा संदेश ही द्यायचा आहे की तुला मारायला प्रभू राम येत आहेत. आणि हे काम ते छोटे मोठे राक्षसांना मारून करू इच्छित होते. त्राटीका त्रास देते म्हणून तिला मार असे सांगितले.अवघे २ बाण त्राटिकेला मारले आणि ती अक्राळ विक्राळ त्राटिका मेली.रामांनी तिला मारलेले पाहून विश्वामित्राना खात्री पटली की हाच तो जगाचा तारणहार आहे. **(क्रमशः)**

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

## फुलमाला....




लव्हेंडर फुल...


लव्हेंडर फुले असतात निळ्या, जांभळ्या रंगांची
नाजूक साजूक रूप यांचे उधळण करतात सुगंधाची..

या सुंदर फुलांपासून आपल्याला मिळते
सुगंधी तेल आणि अत्तर
या तेल अत्तराचा वापर केल्याने मन राहते प्रसन्न निरंतर..

लव्हेंडरच्या फुलांची सजावटही होते खूप खूप छान
अनेक गुणांमुळे यांना नेहमीच मिळतो सन्मान...

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

रात्र गंभीर गंभीर होत चाललेली असते. मुलांचे गाणेही थांबलेले असते. गुडूप अंधार पडलेला असतो. दूर दूर गावातील रस्त्यातून एखाद दुसरा दिवा क्वचित मधून मधून लुकलुकत असतो. पुढे तेही दिवे रस्त्यातून जायचे बंद होतात. आकाशातील तार्यांच्या प्रकाशाशिवाय कुठेही प्रकाश नाही दिसत. मला झोप येऊ लागते. ती येऊ लागली की मी हळूहळू उठतो आणि झोपायला जातो. नंतर बऱ्याच वेळाने केव्हातरी पूर्वेकडील दरवाज्यातून दिसणारे आकाश अंधार फिकट होत जाऊन हळूहळू उजळू लागते. जवळपासच्या झाडात एखाद दुसरी सारिका खसपस करीत असते. ढगांवर सोनेरी छटा उमटू लागते. थोड्याच वेळात साडेचारच्या घंटेचे टोल ऐकू येऊ लागतात. मी उठून पूर्वेकडील गच्चीतील दगडी चौरंगावर आसन पसरून उपासनेला बसतो. सूर्य हळूहळू वर येऊन आपल्या प्रकाशाच्या स्पर्शाने मला आशीर्वाद देतो. आजकाल अगदी सकाळीच मला न्याहरीला बसावे लागते. कारण साडेसहा वाजता आश्रमातील सर्व बालक मंडळी विद्यालयाच्या समोरील मैदानावर एकत्र होते.

तेथे कोणते ना कोणते गाणे म्हटल्यानंतर विद्यालयाचे काम सुरू होते. पहिल्या घंटेला मला वर्ग नसतो. पण त्या वेळात मी माझ्या खोलीत जाऊन शिकवायची पुस्तकं आणि टिपणही नजरे खालून घालतो. मग माझे काम सुरू होते. दिवस-रात्र चालणाऱ्या माझ्या कामाचा हिशेब मी तुला दिला. किती शांतपणे दिवस जातो माझा ! मुलांसाठी हे असे काम करणे मला खूप आवडते. मी त्यांच्यासाठी हे जे काम करतो त्याला काही मोल आहे याची त्यांना कल्पना नाही. सूर्याच्या प्रकाशाचा फायदा अनायासे ती जशी घेत असतात, तशीच ती आमच्या सेवेचा फायदा घेत आहेत. पुढे ही मुले जेव्हा मोठी होतील, तेव्हा मग त्यांना येथील एक एक गोष्ट आठवू लागेल. येथील आकाशातील विपुल प्रकाश, इथे वाहणारे खुले वारे आणि सकाळी आणि संध्याकाळी झाडाखाली बसून शांतपणे देवीला केले जाणारे नमन सारे आठवेल.‘‘

सत्येंद्रनाथ टागोर हे रवींद्रनाथांचे वडीलबंधू. ते आपल्या सेवाकाळात महाराष्ट्रात जिल्हाधिकारी आणि जिल्हा न्यायाधीश म्हणून कार्यरत होते. इंदिरादेवी ही त्यांची मुलगी. १८८५ ते १८९५ या दहा वर्षांच्या कालखंडात त्यांनी तिला अनेक पत्रे लिहिली. या काळात ते तेव्हाच्या पूर्व बंगालमध्ये म्हणजे आताच्या बांगलादेशमध्ये असलेल्या आपल्या इस्टेटची देखरेख करण्यासाठी पद्मा नदीवर असलेल्या पद्मा नावाच्या बोटीमध्ये राहात आणि प्रवास करत. तेथूनच त्यांनी आपल्या महाराष्ट्रात असलेल्या या पुतणीला पत्रे लिहिली. ही सगळे पत्रे इंदिरादेवींनी जपून ठेवली आणि नंतर आपल्या स्वतःच्या हस्ताक्षरात ती लिहून काढली आणि आपल्या काकांना म्हणजेच रवींद्रनाथांना ती भेट दिली. रवींद्रनाथांनी या पुस्तकाला या पत्रांवर भाषेच्या दृष्टीने काही संस्कार करून ती पत्रे सामान्य वाचकांसाठी प्रकाशित केली. या पत्रांमधील काही कौटुंबिक उल्लेख गाळून टाकले आहेत. त्याचप्रमाणे भाषेच्या दृष्टीनेही काही पत्रांचे पुनर्लेखन केले असल्यामुळे या पत्रांना छिन्नपत्रे असे म्हटले जाते. यातील जवळपास प्रत्येक पत्रातून त्यांचे निसर्गप्रेम व्यक्त झाले आहे.

शिलाईदह येथून १७ जून १८९२ या दिवशी इंदिरेला लिहिलेले एक सुंदर पत्र आपण इथे पाहू या. पत्रातून त्यांच्यातील निसर्गप्रेमी तर दिसतोच पण तो निसर्ग त्यांना कशाप्रकारे प्रेरणा देत होता आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करीत होता हेही आपल्याला बघायला मिळतं. आपल्यासाठी देखील हे पत्र खूप मार्गदर्शक आहे असं मला वाटतं.

प्रिय इंदिरा, आजकाल मी संध्याकाळच्या सुमाराला किनाऱ्यावर उतरून बराच वेळ फिरतो. पूर्वेला वळल्यावर एक सुंदर दृश्य दिसतं. पश्चिमेला वळल्यावर दुसऱ्या प्रकारचं दृश्य दिसतं. आकाशातून माझ्या माथ्यावर जणू सांत्वनाची वृष्टी होत राहते. माझ्या दोन्ही डोळ्यांमधून स्वर्गमय मांगल्याची एक धारा माझ्या अंतरंगात प्रवेश करत असते. या वाऱ्यात, आकाशात आणि प्रकाशात प्रतिक्षणी माझ्या मनातून जणू नवीन पालवी फुटते. मी नवीन प्राणाने आणि बलाने परिपूर्ण होऊन जातो. संसारातील सगळी काम करणं आणि लोकांशी व्यवहार करणं मला आता अगदी सहज वाटतं. खरंतर सगळंच सोपं असतं. एकच सरळ रस्ता असतो. तोच धरून चाललं की झालं. नाना प्रकारचे शॉर्टकट्स डोकं लढवून शोधण्याची मला गरज वाटत नाही. सुखदुःखं सगळ्याच मार्गांवरती असतात. कुठल्याही मार्गावर त्यांना टाळण्याचा उपाय नसतो. पण शांती केवळ या मोठ्या रस्त्यावरच असते.

(क्रमशः)

# शिक्षण व समाजव्यवस्थेतील मुद्द्यांवर भाष्य... निबार....

ज्योतिर्मय साहित्य

**मराठी सिनेसृष्टीनं कायमच सामाजिक भान जपत विविध विषय हाताळले आहेत. नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आलेला ‘निबार’ हा चित्रपटही शिक्षण आणि समाजव्यवस्थेतील मुद्द्यांवर भाष्य करणारा ठरणार आहे. या चित्रपटावर टाकलेला हा दृष्टीक्षेप....**

शाळा ही फक्त शिक्षण देण्याचं ठिकाण नाही, तर स्वप्नं घडवण्याची एक प्रयोगशाळा असते आणि या प्रयोगशाळेचा खरा शिल्पकार असतो शिक्षक. अशाच एका शिक्षकाची मनाला भिडणारी कथा म्हणजे ‘‘निबार’’ हा मराठी चित्रपट. ध्रुव फिल्म्स अँड एंटरटेनमेंट या बॅनरखाली संतोष भणगे, अनिकेत माळी आणि भरत सावंत यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून, जितेंद्र भास्कर ठाकरे सहनिर्माते आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन सुनील शिंदे यांनी केलं आहे. पोस्टरमध्ये मराठी चित्रपटसृष्टीतील काही लोकप्रिय चेहरे झळकत असून, निबार’ एक सशक्त विषय हाताळणारा चित्रपट ठरणार असून तो प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडतोय .




शशांक केतकरला होणार सून मी ह्या घरची या मालिकेतील श्री या भूमिकेमुळे विशेष ओळख मिळाली असून त्यानं नाटकं, मालिका आणि ३१ दिवस, वन वे तिकीट सारख्या चित्रपटात दर्जेदार अभिनय केला आहे. सायली संजीवची ‘काहे दिया परदेस’ या मालिकेपासून कारकीर्द झपाट्यानं वाढली. तिनं झिम्मा, बस्ता, गोष्ट एका पैठणीची सारख्या चित्रपटांतून वेगवेगळ्या भूमिका अत्यंत नैसर्गिकपणे साकारलेल्या आहेत. रिंगण रेडू, मस्का, कागर सारख्या चित्रपटातून शशांक शेंडे यांनी अभिनयाचं नाणं खणखणीतपणे वाजविले आहे.

देविका दफ्तरदार आणि अरुण नलावडे यांच्यासारखे अनुभवी कलाकारही या चित्रपटाचा भाग आहेत. याशिवाय शांता तांबे, राजेश दुर्गे आणि अनिकेत माळी यांनीही या चित्रपटात भूमिका साकारल्या आहेत. या चित्रपटाची कथा आणि संवाद राजेश दुर्गे आणि सुनील शिंदे यांनी लिहिले असून, वैभव देशमुख यांनी गीतलेखन केलं आहे. संगीतकार रोहित नागभिडे यांचे संगीत असून आदर्श शिंदे आणि रोहित राऊत यांनी गाणी गायली आहेत. धनंजय कुलकर्णी यांनी छायाचित्रण, तर सुनील जाधव यांनी संकलन केलं आहे. कला दिग्दर्शन सतिश बिडकर, साऊंड डिझाईन अभिजीत देव, कास्टिंग आणि लाईन प्रॉडक्शन शिरीष राणे आणि कार्यकारी निर्माते म्हणून अमोल गायकवाड यांनी काम पाहिलं आहे.

शशांक केतकरने साकारलेला मुख्याध्यापक किरण शिंदे हा केवळ एक पात्र नाही, तर ग्रामीण भागातील हजारो संघर्ष करणाऱ्या शिक्षकांचे प्रतिनिधित्व करणारा आवाज आहे. मुलांच्या डोळ्यांत स्वप्नं ओळखणारा, त्यांना चुकवलेली दिशा दाखवणारा आणि अंधारातही प्रकाश दाखवणारा तो शिक्षक मनात घर करतो.

चित्रपटातील एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मुलांचे भवितव्य आणि त्यांच्या शिक्षणाबाबतची पालकांची भूमिका. काही पालक आपल्या मुलांमध्ये उद्याचा डॉक्टर, इंजिनीयर, शास्त्रज्ञ पाहतात, तर काहीजण त्यांना फक्त कमाईचं साधन म्हणून पाहतात. ही सामाजिक विसंगती ‘निबार’ प्रभावीपणे मांडतो.सायली संजीवने शशांकला अभिनयात सुरेख साथ दिली आहे. त्यांच्या मधल्या नात्यातली हळुवारशी लज्जा, समजूतदारपणा आणि भावनिक संघर्ष, हे सर्व फारच सुंदर पद्धतीने रंगवले आहे.पाच बाल कलाकारांची प्रमुख भूमिका ही देखील चित्रपटाला एक नवे परिमाण देते. त्यांच्या डोळ्यांतली निरागसता आणि जीवनातले चढउतार आपल्या मनात घर करून राहतात. चित्रपटाचं गीत-संगीत हे कथा अधिक प्रभावीपणे मांडण्याचं माध्यम ठरतं. त्या पाचही मुलांच्या भूमिका त्यांनी उत्तमरीत्या वठवल्या आहेत. गरिबी पायाशी बांधून असली तरी शिक्षणविषयक

रोहित नागभिडे यांचं संगीत आणि वैभव देशमुख यांची गीतं मनाच्या खोल कप्प्यात जाऊन भिडतात. छायालेखक धनंजय कुलकर्णी यांनी घेतलेली दृश्यं वास्तवाशी नातं सांगणारी आहेत; तर सुनील शिंदे यांचं दिग्दर्शन चित्रपटाला एक आशयघन दिशा देतं.छायालेखक धनंजय कुलकर्णी यांनी ग्रामीण भागाचा नैसर्गिक प्रकाश आणि वातावरण सुंदरपणे टिपले आहे. संपादन टोकदार असून, काही प्रसंगांमध्ये संयमित चाललेली गती हळुवार भावना अधिक प्रभावी बनवते. कला दिग्दर्शक सतिश बिडकर यांचे गावाचे सेटअप आणि बारीकसारीक तपशीलही उल्लेखनीय आहेत.

दिग्गज कलाकारांची जुगलबंदी, वास्तवदर्शी संवाद, आणि भावनिक बांधणी ही ‘निबार’ची खरी जमेची बाजू आहे. हा चित्रपट केवळ एक सामाजिक भाष्य नाही, तर तो शिक्षणाच्या हक्कासाठी लढणाऱ्या




प्रत्येक शिक्षकाची कहाणी आहे.निबार हा केवळ एक चित्रपट नसून, तो एका समाजाचा आरसा आहे. माणूसपण, चूक, पश्चात्ताप आणि नव्याने उभं राहण्याची जिद्द या सर्वांवर भाष्य करणारा हा सिनेमा आपल्याला अंतर्मुख करतो. कथेची सादरीकरण आणि अभिनय यामध्ये जराही ढिलाई नाही.‘‘निबार’’ या चित्रपटात प्रमुख भूमिकेत शशांक केतकरने ‘किरण शिंदे’ची व्यक्तिरेखा ताकदीने साकारली आहे. त्याच्यासोबत शशांक शेंडे (धोंड्या), सायली संजीव (संगीता), आणि देविका दफ्तरदार (बायानी) यांचे अभिनयही विशेष लक्षवेधी आहे. अरुण नलावडे, सोनाली पाटील, आणि आज्ञेश मुडशिंगकर यांच्यासारख्या अनुभवी कलाकारांची उपस्थिती चित्रपटात सशक्तपणा आणते.

शशांक केतकरने साकारलेली मुख्याध्यापकाची व्यक्तिरेखा मनाला भावणारी आहे. मूल जन्माला येताच प्रत्येक आई-वडील त्याच्या भवितव्याबाबत विचार करू लागतात. त्याला सर्वोत्तम शाळेत दाखल करून शिक्षीत करण्याकडे त्यांचा कल असतो, पण जगात असेही काही आई-वडील आहेत, जे मुलांना शाळेत पाठवण्याऐवजी त्यांच्याकडे कमाईचे साधन म्हणून पाहतात. या चित्रपटात पाच मुले मुख्य भूमिकेत असून, शशांक केतकरने साकारलेला शिक्षक लक्ष वेधून घेतो. शशांकला सायली संजीवने सुरेख साथ दिली आहे. चित्रपटातील गीत-संगीत मनाला भिडणारे असून, छायालेखन आणि वास्तवदर्शी लोकेशन्स कथानकाला अचूक न्याय देणारे आहे. दिग्गज कलाकारांच्या अभिनयाची जुगलबंदी आणि कुशल दिग्दर्शन ‘निबार’च्या जमेची बाजू आहे.

निबार म्हणजे ‘‘निर्णय‘‘ आणि हा निर्णय आहे गाव, समाज, व्यक्ती आणि नात्यांमधील संघर्षातून साकारत जाणाऱ्या मूल्यांचा. एक गाव, त्यातले लोक, त्यांच्या चुकांची किंमत आणि त्या चुकांमधून शिकलेली जीवनशिक्षा या साऱ्याच गोष्टी निबार मधून प्रभावीपणे मांडल्या आहेत.

चित्रपटाची पटकथा हळूहळू उलगडत जाते आणि प्रेक्षकाला प्रत्येक वळणावर गुंतवत ठेवते. संवाद वास्तवदर्शी आहेत, तर पार्श्वसंगीत प्रसंगांना योग्य साथ देते.‘‘निबार’’ पाहून मन हेलावलं. शिक्षण हा मुलांचा अधिकार आहे हे केवळ विधान नसून ते जीवनाच्या पायाशी असलेलं सत्य आहे. हा चित्रपट त्या सत्याला अत्यंत संवेदनशीलपणे हाताळतो. चित्रपटातील शिक्षकाची भूमिका, विशेषतः शशांक केतकरचा अभिनय, अत्यंत प्रभावी आहे. या घटनेतील हक्काची जाणीव केवळ कायद्यातच नव्हे तर समाजाच्या मनातही पोहोचवणं हे निबारचं खरं यश आहे. ही केवळ एक कथा नाही, ही एक जाणीव आहे. समाजाला विचार करायला लावणारा आणि मुलांच्या भवितव्याबद्दल अधिक जबाबदारीने वागायला शिकवणारा चित्रपट.‘निबार’ म्हणजे एका शिक्षकाचं स्वप्न, मुलांचं भविष्य आणि समाजाच्या आरशातलं वास्तव! हा चित्रपट प्रत्येक पालक आणि प्रत्येक शिक्षणप्रेमींनी आवर्जून पाहावा.‘‘

चित्रपट : ‘‘निबार’’
प्रदर्शित दिनांक: १३ जून
बॅनर: ध्रुव फिल्म्स अँड एन्टरटेन्मेंट
दिग्दर्शक: सुनील शिंदे
लेखन: सुनील शिंदे (कथा), राजेश दुर्गे व सुनील शिंदे (पटकथा, संवाद)
निर्माते: संतोष भणगे, अनिकेत माळी, भरत सावंत
छायाचित्रण: धनंजय कुलकर्णी
संपादन: सुनील जाधव
संगीत: रोहित नागभिडे
गीत: वैभव देशमुख
गायक: आदर्श शिंदे, रोहित राऊत
रेटिंग: ४.५ / ५

***

ज्योतिर्मय
साहित्याचे विद्यापीठ



आठवणीतले बालपण

*मित्रांनो, प्रत्येकाच्या आयुष्यात बालपणीचे विशेष महत्व असते, रम्य ते बालपण, खरंच बालपणीसारखी मज्जा परत कधीच येत नाही आता ते दिवस आठवले तरी मन खूप प्रसन्न होतं, तर आपण सर्वजण परत एकदा त्या बालपणीच्या विश्वात जाऊया, त्या आठवणींना एकदा उजाळा देऊयात ज्योतिर्मयच्या माध्यमातून. मग लिहायला सुरुवात करा व पटकन पाठवा मला 7743918559 या व्हाट्सअप नंबरवर*
*- संजय व्यापारी, संपादक,*
*ज्योतिर्मय साहित्याचे विद्यापीठ.*



इंदापूरी निखारे

## शिकारी कशा आहेत?



ज्योतिर्मय साहित्य

तर वाढदिवस...
आणि अनेकांच्या शुभेच्छा...
तो आठवडा अतिशय आनंदाचा...
फेसबुक मुळे, व्हॉट्सॲप मुळे...
व्हॉट्सॲप वर काही आगाऊ मित्र, मैत्रिणी तर धमाल मेसेज पाठवतात... आणि ते मेसेजेस दरवर्षी आनंदात भर टाकतात... बायकोची एक मैत्रीण... तिने पाठवलेला मेसेज असाच एक...
म्हणजे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा काका...
ती पण मला काका म्हणते...
तिचा मुलगा, मुलगी काका म्हणतात...
म्हणून ती पण काकाच म्हणते...
तिच्या शुभेच्छा यास उत्तर दिले...
खूप खूप धन्यवाद आणि आभार...
परत तिचा लगेच मेसेज...
शिकारी कशा आहेत?
आता मी विचारात पडलो?
शिकारी? नंतर मला मनात जाणवले की...
ही बहुतेक बायको बद्दल बोलत असावी...
आमचा प्रेम विवाह असल्याने...
आणि ४०/४५ वर्षे टिकून आहे...
आता कितीही प्रयत्न केला तरी...
घटस्फोट होण्याची शक्यताच नाही...
म्हणून तिला उत्तर दिले...
धन्यवाद, मजेतच आहे...
परत तिचा मेसेज... काका सॉरी...
चुकून शिकारी झाले...
मला शीला ताई कशा आहेत हे विचारायचे होते...
आता वाढदिवस असल्याने...
आज शहाण्यासारखे वागायचे...
असे ठरवले होते... पण काय करणार?
मूळ आगाऊ स्वभाव...
या अशा आरतीने जागृत झाला...
अहो बरोबर बोलला...
प्रत्येक बायको ही शिकारी असते...
आणि तिचा नेमही नवऱ्याला.. अगदी अचूक बसतो...
त्यासाठी कोणत्याही गुरूची गरज नसते ...
सगळे वाघ बायकोसमोर शेळी असतात...
किंवा अजून असे काही प्राणी...
किडे वगैरे म्हणत नाही हे काही नवऱ्याचे भाग्यच...
बायको जे जे काही ओरडुन...
किंवा किंचाळून... जे काही गाणे गात असते...
आता काहीजण रडगाणे म्हणतात...
ते नवऱ्याचे सर्वात सुमधुर गाणे असते...
सुखी सुखी संसाराचे...
त्यानंतर मग लता दीदी, आशा ताई...
वगैरे वगैरे वगैरे वगैरे...
खरंच किती खरं बोलला आपण...
असे तिचे कौतुक करून...
पुन्हा एकदा आभार मानले...
या वर काही उत्तर दिले नाही...
अजूनही... ४/५ वर्षे झाली...
आता शुभेच्छा मात्र काळजीपूर्वक देत असते...
एकमेव काळजीपूर्वक शुभेच्छा पण...
आनंद देऊन जाते...



# गुरूंच्या संकीर्तनाशिवाय या जगात दुसरे काहीच शाश्वत नाही! - पू. सौ. मनीषा पाठक

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे** – ''गुरूंच्या संकीर्तनाशिवाय या जगात दुसरे काहीच शाश्वत नाही. गुरूंची स्तुती,गुरूंची कीर्ती,गुरूंची महती आणि गुरूंचे कीर्तनच मनुष्याला तारून नेते. गुरु स्थूलदेहाने जरी वेगळे असले तरी गुरुतत्त्वाने सर्व जोडलेले असतात'', असे सनातनच्या संस्थेच्या१२३ व्या (समष्टी) संत,पू.(सौ.) मनीषा पाठक यांनी मार्गदर्शनात सांगितले. विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी लिहिलेल्या १. आध्यात्मिक जीवनएक अंतर्मुख प्रवास आणि२. गुरुकृपाआणि आत्मबोधया दोन अध्यात्मिक ग्रंथ लोकार्पण सोहळ्यात त्या बोलत होत्या.

हा सोहळा शब्दातून अनुभवण्यापेक्षा अंतरंगातून अनुभवण्याचा आहे. हा ग्रंथलोकारपणाचा कार्यक्रम असूनही कार्यक्रमांमध्ये सर्वजण एकरूप आहेत. सर्व श्रद्धावंत जीव येथे उपस्थित आहेत. येथे कोणताही दिखाऊपणा नसून सहजता आणि आनंद जाणवत आहे. सभागृहामध्ये प्रवेश केल्यावर गुरुभक्तीचा दैवी सुगंध आल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

सर्वांच्या साधनेतील अडथळे दूर व्हावेत अध्यात्मिक जीवांची प्रगती व्हावी अशी पू. सौ. मनीषा पाठक यांनी सद्गुरूंच्या चरणी प्रार्थना केली.

या सोहळ्याला गायिका चारुशीला बेलसरे,संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अरविंद नेरकर,सनातन संस्थेच्या संत पू. सौ. मनीषा पाठक आणि परमपूज्य मुंगळे महाराजांचा (सद्गुरुंचा) बालपणीचा सहवास लाभलेल्या डॉ. सुमती देशपांडे मंचावर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांना भेटवस्तू,शाल,आणि सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

गायिका चारुशीला बेलसरे यांना गुळवणी महाराजांनी शक्तिपात दीक्षा दिली,तर हृदयनाथ मंगेशकर यांनी 'बाल लता'ही उपाधी दिली आहे. गुरु,आई,वडील आणि परमेश्वर यांना वंदन केले पाहिजे. ज्यांच्याकडून आपण शिकतो त्यांचे स्मरण सतत ठेवायला हवे. भक्तीयोग आणि नामयोग याचा वटवृक्ष प्रत्येकाच्या मनी उभा राहून त्याचा आत्मज्ञानाचा वृक्ष व्हायला हवा. मनुष्याने अहम बाळगू नये. मन,चित्त हे सतत सद्गुरूंच्या चरणी ठेवावे तरच मनुष्य जन्माचे सार्थक होते, असे चारुशीला बेलसरे यांनी त्यांच्या मार्गदर्शनात सांगितले.

मी वारीचा 'अभ्यासक'नसून 'उपासक'आहे ! – डॉ. अरविंद नेरकर

संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. अरविंद बेलसरे यांनी 'पंढरपूर वारी आणि मराठी साहित्य'यावर संशोधन केले गोड बोलण्याने आपले नुकसान न होता लाभच होतो प्रपंचातून परमार्थ साधावा. मात्र परमार्थ हा चर्चेचा विषय नसून अनुभूतीचा विषय आहे,ही संतांची शिकवण सर्वांनी ध्यानात घ्यायला हवी. मी अनेक वर्ष वारी केली,पण मी वारीचा अभ्यासक नाही तर उपासक आहे असे मत डॉक्टर अरविंद नेरकर यांनी व्यक्त केले.




डॉ. सुमतीताई देशपांडे यांनी सद्गुरु परमपूज्य मुंगळे महाराज यांच्या सहवासातील बालपणीच्या आठवणी कथन केल्या. कार्यक्रमाला संत,साधक,मित्रपरिवार,शिक्षक आप्तेष्ट हितचिंतक आदी १०० हून अधिक जण उपस्थित होते. विद्यावाचस्पती विद्यानंद यांचे सद्गुरू प.पू. मुंगळे महाराज यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून ग्रंथ प्रकाशनाचा अनौपचारिक कार्यक्रम सोहळा आयोजित केला होता.

(लेखक) विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी सद्गुरूबद्दल लिहिलेले गौरवोद्गार त्यांच्या प्रतिकृतज्ञता म्हणून केलेल्या लेखनाचे वाचन सनातन संस्थेच्या सौ. प्रीती कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

अतिशय भावपूर्ण आणि आनंददायी वातावरणात हा सोहळा संपन्न झाला.

श्री. शैलेश अनंत कुलकर्णी (लेखक) यांना त्यांचे सद्गुरु प.पू. मुंगळे महाराज यांनी 'विद्यावाचस्पती विद्यानंद'ही उपाधी बहाल केली. सनातन वैदिक संस्कृती आणि तिचे वैभव टिकवण्याचे निरंतर कार्य सनातन संस्था करत आहे. समाजातील विकृतींना नष्ट करून क्रियाशीलतेसाठी मिळणारी प्रेरणा टिकवून ठेवण्याचे कार्य सनातन संस्था करत आहे असे सनातन संस्थेविषयी गौरवोद्गार विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी व्यक्त केले. सनातन संस्थेच्या संत पू. सौ. मनीषा पाठक यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी संमती दिली याप्रती त्यांनी संतांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यावाचस्पती विद्यानंद यांनी सद्गुरु परमपूज्य मुंगळे महाराज यांच्या प्रति कृतज्ञता म्हणून लिहिलेल्या लेखनाचे सार :

१. प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे प.पू. मुंगळे महाराजांचे जीवन होय.

२. नामाचे,ध्यानाचे सद्गुरूंच्या कृपेचे आणि ईश्वरी इच्छेचे महत्त्व आणि महात्म्य सांगून सद्गुरूंनी त्यांच्या संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाच्या जीवनातील क्षण विलक्षण केले.

३. संपूर्ण ब्रम्हांडात चैतन्य निर्माण करणारे शब्द,लालित्य म्हणजे सद्गुरूंची प्रवचनेच होय.

४. नामाची गोडी आणि भगवंताची जोडी जेव्हा प्राप्त होते तेव्हाच मनुष्य जगण्यापलीकडील जीवनाची अनुभूती प्राप्त करू शकतो.

५. काळ वेळ परिस्थिती कशाचेच बंधन नामाला नाही.

६. प्रत्येक साधकाने साधना ही नियमित कर्तव्य समजून नित्य नियमाने,अंतर्मुख होऊन,आत्मभान जागृत ठेवून,आत्मिक आनंदासाठी केली पाहिजे. आणि त्यासाठी सर्वप्रथम आत्मनिष्ठ होणे जरुरीचे असते. त्यामुळे आपल्यात नवचैतन्य,नवीन उमेद,नवा उत्साह आणि नवा जोश निर्माण होतो. त्यामुळे मनुष्याचा आत्मविश्वास वाढीस लागण्याची सुरुवात होते.

७. जीवनात घडलेली,घडणारी आणि घडत असलेली प्रत्येक गोष्ट ही ईश्वरचरणी होते.

८. देहबुद्धी मुळापासून जाळून टाकल्याने मनुष्याच्या आचारात,विचारात,उच्चारात,वर्तनात आणि व्यवहारात 'मी'अथवा 'माझेपण'दिसत नाही.

लेखक परिचय

१. विद्यावाचस्पती विद्यानंद यांना सद्गुरु मुंगळे महाराज गुरु म्हणून लाभले. सन २००० पासून त्यांची साधना चालू आहे. मागील पाच वर्षापासून सायंकाळी ६.३० ते दुसऱ्या दिवशी सकाळी ११.३० पर्यंत १७ तास ते मौन साधना करतात.

लेखक विद्यवाचस्पती विद्यानंद यांनीच कार्यक्रमाचे निवेदन केले.

व्यावहारीक जीवनात त्यांनी वेगवेगळ्या विषयांच्या ३८ हून अधिक पदव्या प्राप्त केल्या आहेत. शिक्षण क्षेत्रातही ते मोठ्या पदावर कार्यरत होते.

२. दर्शन पुस्तिका खंड एक मध्ये विद्यावाचस्पती विद्यानंदांचे गुरु परमपूज्य मुंगळे महाराज यांचे सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत आठवले,यांच्या समवेत असलेल्या छायाचित्राचा संदर्भ देऊन सनातन संस्था आणि दोन्ही गुरूंच्या चरणी त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

३. सनातन संस्थेच्या संत पू. सौ. मनीषा पाठक यांना तेथे उपस्थित असणारे भक्त येऊन भेटत होते.

# पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षण मिळावे!

**ज्योतिर्मय साहित्य**

औरंगाबादेतील वाळूंज भागातील पत्नीपीडित पुरुषांच्या आश्रमात काही पत्नीपीडित पुरुषांनी वटपौर्णिमेच्या आदल्या दिवशी पिंपळपूजन करून पिंपळपौर्णिमा साजरी केली. हे पुरुष दरवर्षी पिंपळपौर्णिमा साजरी करतात. आमच्या बायकांनी आम्हाला इतका त्रास दिला आहे की आम्ही त्यांच्यासोबत सात जन्मच काय सात सेकंदही संसार करू शकत नाही म्हणूनच आम्हाला अशा प्रकारच्या बायका देण्यापेक्षा कायमस्वरूपी मुंजा ठेव अशी प्रार्थना ते यम आणि मुंजाला करतात. हा प्रकार काहीसा विचित्र वाटत असला तरी खरा आहे. पुरुषही कौटुंबिक हिंसाचाराचे बळी ठरतात यावर अजूनही अनेकांचा विश्वास बसत नाही याला कारण आहे आपली पुरुष प्रधान संस्कृती. पुरुषच महिलांवर अत्याचार करतो, त्यांचा मानसिक छळ करतो हेच आजवर आपण पाहत आलो आहोत पण आता काळ बदलला आहे. पुरुषही महिलांच्या अत्याचाराला बळी पडत आहे. आज कितीतरी पुरुष महिलांचा मानसिक अत्याचार सहन करत आहेत. पत्नी आपल्यावर अत्याचार करते आपला मानसिक छळ करते हे जर समाजात माहीत झाले तर आपलीच नाचक्की होईल या भीतीने अनेक पुरुष तो अत्याचार मुकाट्याने सहन करतात. ज्यांना हा अत्याचार सहन होत नाही ते आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात.

श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

काही महिन्यांपूर्वी बंगळुरू मध्ये एका कंपनीत अभियंता असलेल्या ३४ वर्षीय अतुल सुभाष या तरुणाने पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी या तरुणाने आपल्यावरील आपबिती ९० मिनिटांचा व्हिडिओ काढून तसेच ४० पाणी सुसाईड नोट लिहून सांगितली. या तरुणाला त्याच्या पत्नी आणि सासरच्यांनी हुंडाबळीच्या चुकीच्या आरोपाखाली तरुंगामध्ये पाठवले होते. काहीही चूक नसताना या तरुणाला तुरुंगात जावे लागले. न्यायालयात तो स्वतःचं निर्दोषत्व सिद्ध करू शकला नाही. समाजात त्याची बदनामी झाली त्यामुळे आलेल्या नैराश्यातून त्याने आत्महत्या केली. अर्थात अशी आत्महत्या करणारा अतुल सुभाष हा पहिला तरुण नाही याआधीही अनेक तरुणांनी पत्नीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केल्या आहेत. आताही काही दिवसांपूर्वी पुणे जिल्ह्यातील उरुळी येथे एका तरुणाने याच कारणाने आत्महत्या केल्याची बातमी वर्तमानपत्रात वाचनात आली. महिलेचा पती व त्याच्या कुटुंबियांकडून होणारा छळ रोखण्यासाठी ४९८ ( अ ) हा कायदा करण्यात आला. महिलांना संरक्षण देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या कायद्याचा अलीकडे मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होऊ लागला आहे. या माध्यमातून पती आणि सासरच्या लोकांविरुद्ध वैयक्तिक सुड उगवला जात आहे. महिलांनी त्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या कायद्याचा अशाप्रकारे दुरुपयोग करू नये अशी टिप्पणी माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील केली आहे. तरीही या कायद्याचा दुरुपयोग कमी होत नाही. पत्नीने पती विरुद्ध तक्रार दिली तर त्याची तातडीने दखल घेतली जाते. पत्नीवर अन्याय करणाऱ्या पतीला तात्काळ अटक केली जाते पण पतीला पत्नी विरुद्ध कारवाई करायची असेल, तर आपल्या देशात कौटुंबिक हिंसाचार अधिनियमना सारखा कायदा उपलब्ध नाही. सध्या असलेला कौटुंबिक अधिनियम संरक्षण कायदा पुरुषांना संरक्षण देत नाही. महिलांप्रमाणेच पत्नी पीडित पुरुषांनाही संरक्षणाचा अधिकार मिळावा यासाठी सरकारने कौटुंबिक हिंसाचार अधिनियम कायद्यात दुरुस्ती करून पत्नी पीडित पुरुषांना संरक्षण द्यावे.

***

# गाण्यातून वडिलांना साद

**ज्योतिर्मय साहित्य**

वडील आणि मुलीच्या नात्यातील गोडवा शब्दांतून व्यक्त करणं तसं अवघडच. जन्मापासून आयुष्याच्या प्रत्येक वळणावर वडिलांची साथ, पाठिंबा महत्त्वाचा असतो याची जाणीव मुलींना नक्कीच असते. या सुंदर नात्यावर आधारलेलं एक गीत लवकरच आपल्या भेटीला येत आहे. आगामी 'अवकारीका' या मराठी चित्रपटातील हे गीत सुप्रसिद्ध गायिका सुनिधी चौहान हिने गायलंय.

का रे बाबा  का रे पप्पा
कुठे हरवल्या तुझ्या छान-छान गप्पा....
तू सांग ना तू सांग ना
तू सांग ना.... हा माझ्या बाबा

असे बोल असलेलं हे गीत अरविंद भोसले यांनी लिहिलं असून श्रेयस देशपांडे यांचे संगीत गीताला लाभले आहेत. बाप लेकीचे भावनिक नाते उलगडणारं 'अवकारीका' चित्रपटामधील हृदयस्पर्शी गाणं आपल्या आयुष्यात असलेले वडिलांचे स्थान आणि त्यांनी आपल्यासाठी घेतलेले कष्ट या सर्वांची जाणीव करुन देते. येणाऱ्या फादर्स डे च्या निमित्ताने हे गीत वडील मुलीच्या नात्यासाठी सुंदर भेट ठरेल. हे गीत गाताना खूप मजा आली. प्रेक्षकांच्या अंतर्मनाचा ठाव हे गाणं घेईल, असा



विश्वास गायिका सुनिधी चौहान यांनी व्यक्त केला.

रेडबड मोशन पिक्चर या बॅनरअंतर्गत येत्या १ ऑगस्टला भेटीला येणाऱ्या 'अवकारीका' चित्रपटाचे दिग्दर्शन अरविंद भोसले यांचे आहे. या चित्रपटाची निर्मिती भारत टिळेकर, अरुण जाधव यांनी केली असून सहनिर्मिती मनोज गायकवाड, अरविंद भोसले, मृणाल कानडे, गीता सिंग यांची आहे.

# शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं ?

**ज्योतिर्मय साहित्य**

ज्या गोष्टीची गरज आपल्याला जेव्हा भासते. त्या गोष्टी मिळविण्यासाठी आपण प्रत्यक्ष प्रयत्न करतो व त्या गोष्टी मिळविण्यासाठी आपण प्रयोगही करतो. त्यासाठी निरीक्षण करतो. म्हणूनच त्या काळात लोकांना शोध महत्वाचे वाटले व जे शोध लावले गेले. ते निरीक्षणातून लावले गेले. ज्यासाठी आपल्या पुर्वजांना शाळेत जायची गरज नव्हतीच. आपलं मात्र त्यातील कोणत्याच शोधाकडे लक्ष गेलं नाही.

नवीन शैक्षणिक धोरण. यात जो अभ्यासक्रम बनवला. त्यात अशा शोधावरच जास्त भर दिल्या गेला. त्याचं कारण आहे, तंत्रज्ञ तयार करणे. हेच तंत्रज्ञ तयार व्हावेत म्हणून शासनानं नवीन शैक्षणिक धोरणात त्यासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार केला. ज्यात प्रकल्प, नवोपक्रम व कृतीसंशोधनावर भर दिला. ज्यात प्रकल्प ही संशोधनाची पहिली पायरी आहे.

प्रकल्प...... प्रकल्प म्हणजे कोणत्याही प्रक्रियेत विशिष्ट उद्दीष्टे साध्य करण्यासाठी असलेले व्यावहारिक कार्य किंवा उपक्रम. यामध्ये लोकांना स्वशिक्षणाची संधी मिळते. तसेच त्यांच्या सर्जनशिलतेला वाव मिळतो. विश्लेषण कौशल्य आणि समस्या सोडविण्याच्या क्षमतेत वाढ होते. जो भाग बाल्यावस्थेपासूनच विद्यार्थ्यांना शिकवला जातो. ज्यातून शोध कसे लावावे लागतात. याची अनुभूती प्रकल्प माध्यमातून विद्यार्थ्यांना होते व ते साहजिकच शोधाकडे वळत असतात. हे सगळं बरोबर असलं तरी आज प्रकल्प म्हणजे काय हे बऱ्याच शिक्षकांना कळतच नाही. शिक्षणक्षेत्रात आजही असे बरेच शिक्षक आहेत की त्यांना साधा अर्ज कसा लिहायचा, तेही कळत नाही. काही




शिक्षक स्वतः अपडेट व्हायला तयार नाहीत. ते स्वतःमध्ये बदलावच करीत नाहीत. ते शिकविण्यासाठी त्याच जुन्या परंपरागत शिक्षणाच्या पद्धती वापरतात. तसेच आज तंत्रज्ञानाचं युग असतांनाही बऱ्याचशा शाळेत ओव्हरहेड प्रोजेक्टर वापरत नाहीत. बऱ्याचशा शासकीय शाळेची अशीच गत आहे. काही खाजगी शाळेचीही हीच गत आहे. शाळा व्यवस्थापन करणारा व्यक्तीच तशा प्रकारच्या सोयीसुविधा शाळेला पुरवीत नाही. शिवाय प्रकल्प बनविण्यासाठीही थोडासा खर्च येतोच. तो खर्चही काही आईवडील करायला तयार नसतात. त्यामुळं शाळेत राबवल्या जाणाऱ्या उपक्रमावर अंकुश लागतो व त्याची परियंती विद्यार्थ्यांच्या अधोगतीत होतो.


विशेष सांगायचं झाल्यास प्रकल्पातून विद्यार्थ्यात संशोधन वृत्ती वाढीस लागते. त्यासाठी जी निरीक्षण शक्ती लागते. ती विद्यार्थ्यात निर्माण होते व विद्यार्थ्याचं भविष्य उज्ज्वल होते. जर त्या प्रकल्पास पालक, शिक्षक, व्यवस्थापन मंडळ सहकार्य करीत असतील तर. जर असं सहकार्यच प्रकल्पाच्या बाबतीत मिळालं नाही तर ते विद्यार्थी मागे पडतात. ज्यातून त्या विद्यार्थ्यांचंच नाही तर देशाचेही नुकसान होत असतं. असं होवू नये म्हणून प्रत्येक मुलाला शिक्षण मिळावं याचा विचार करणाऱ्या सर्वच घटकांनी निदान प्रकल्प मोहिम राबवितांना सर्वतोपरीनं मदत करावी. ज्यातून शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं ठरेल. यात दुमत नाही. हे तेवढंच खरं.

**(क्रमशः)**

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान !

**ज्योतिर्मय साहित्य**

आज १४ जून, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. १४ जून हा त्यांचा जन्मदिन आहे. डॉ कार्ल लॅंडस्टेनर यांनी एबीओ हा नवा रक्तगट शोधून काढला त्यांच्या या संशोधनासाठी त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले होते. पहिला जागतिक रक्तदाता दिन २००५ साली साजरा झाला होता. त्यानंतर दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. प्रत्येक वर्षी एक सूत्र घेऊन हा दिवस साजरा केला जातो. माता सुरक्षा, रक्तदान श्रेष्ठ दान, डोनेट प्लेटलेट्स यासारखे सूत्र घेऊन त्याची माहिती या दिवशी दिली जाते. रक्तदानाचे आवाहन केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने घोषित केलेल्या या दिवसाच्या साजरीकरणात रेड क्रॉस सोसायटीचा हिरीरीने भाग असतो. कौन्सिल ऑफ युरोप ही संघटना देखील रक्तदाना संदर्भात मोठ्या प्रमाणात जनजागृती करते. आपल्या देशात देखील विविध शासकीय, सामाजिक, सेवाभावी संस्था या दिवसाचे आयोजन करून लोकांमध्ये रक्तदाना संदर्भात जनजागृती करतात. या दिवशी रक्तदात्यांच्या सन्मान केला जातो. रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदान श्रेष्ठ दान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. सुरक्षित रक्त ही अलीकडची वैश्विक समस्या निर्माण झाली आहे. दरवर्षी ९ कोटी युनिटपेक्षा अधिक रक्त दान केले जाते तरीही रक्ताचा तुटवडा जाणवतो. अपघातग्रस्त व्यक्ती, शस्त्रक्रिया झालेले व्यक्ती, रक्तातील त्रुटी असलेले व्याधीग्रस्त व्यक्ती, बाळंतपणात होणारे मातांचे मृत्यू आणि कुपोषण, विविध प्रकारचे बाळ मृत्यू, साथीचे आजार अशावेळी रक्ताची खूप गरज पडते. कोरोना काळात तर रक्ताचा कसा अभूतपूर्व तुटवडा जाणवला होता हे आपण पाहिलेच आहे. कोरोना काळात रक्तदान शिबिरे बंद असल्याने देशात रक्तदानाचा अभूतपूर्व असा तुटवडा जाणवला होता. रक्ताच्या तुटवड्यामुळे अनेक शस्त्रक्रिया पुढे ढकलाव्या लागल्या होत्या. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांना रक्तदान करावे असे आव्हान केले होते. भविष्यातही रक्ताचा असा तुटवडा निर्माण होऊ शकतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो. म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही. विशेष म्हणजे २४ ते ४८ तासात जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुढे येऊन रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असे म्हणून प्रचार होत असला तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खुपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात हे प्रमाण खूप कमी आहे त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते त्यात कोरोना सारख्या महामारीत तर अभूतपूर्व परिस्थिती निर्माण होते. अपघातातील रुग्ण, प्रसव काळ, अतिदक्षता विभाग, तातडीच्या शस्त्रक्रिया अशा वेळी रक्ताची गरज निर्माण होते जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने सजग राहायला हवे. आपल्या रक्तामुळे कुणाचा तरी प्राण वाचणार आहे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559